# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ६/११/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.११) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक **६ नोव्हेंबर २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.४० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
2. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
3. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
4. श्री. मधुकर दामोधर सावंत
5. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
6. श्री. मो. जावेद मो. इसाक
7. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान
8. श्री. अ. रशीद खान (मामु)
9. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
10. श्री. संजय रामदास जोशी
11. श्री. वसंत नरवडे पाटील
12. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
13. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
14. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
15. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : अगोदर विषयपत्रिका घेण्यात येत आहे. विषय क्र.185 ते 188 ला मान्यता देण्यात येते.

**विषय क्र. 185 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.71 अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे व साईड ड्रेन बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.21,67,056/- असून निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 5 निविदा पत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदा पत्रके दर भरून प्राप्त झाली. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 3.01% कमी दराने |
| 2. | चंद्रम्मा एन. आशन्ना | 4.00% जास्त दराने |
| 3. | विजय बिशनदास अरोरा | 12.66% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए.एस.कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.01% ने कमी आहेत. यास मा. आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती सभेत सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 3.01% कमी दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.71 अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे व साईड ड्रेन बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 3.01% कमी दराची ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 186 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.23 मसनतपुर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन 225 मी.मी. व्यासाची एसडब्ल्यूजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. रक्कम रू.13,00,000/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभा दि.20.2.2007 ठराव क्र.709 अन्वये मंजुरी प्राप्त झाली. प्रस्तुत कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत सहा(6) निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.सुंदर कन्स्ट्रक्शन | 0.25% कमी दराने |
| 2. | मे.एल.के. कन्स्ट्रक्शन | 3.70% जास्त दराने |
| 3. | श्री.शेख सलीम मोहीनोद्यीन | 5.15% जास्त दराने |
| 4. | श्री.एस.एम. इब्राहीम | 20% जास्त दराने |
| 5. | श्री. काझी एम. एम. | SINGLE ENVELOPE NOT TO OPEN |
| 6. | श्री. अब्दुल कदीर | SINGLE ENVELOPE NOT TO OPEN |

सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.25% कमी दराची मे.सुंदर कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. त्यास मा.आयुक्त यांनी 5% कमी दराने मान्यता दिली आहे. त्यास मे. सुंदर कन्स्ट्रक्शनचे व्यवस्थापक यांनी सहमती दिली आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र जा.क्र. 2007/नपाप्र/मनपाऔ/दविसुयो/कावि/1521, दिनांक 5/9/2007 अन्वये प्रस्तुत काम महाराष्ट्र शासनाची नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतगत उपलब्ध तरतूदीतून करणेसाठी मान्यता मिळाली आहे.

तरी मे. सुंदर कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 5% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.23 मसनतपुर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत जुनी ड्रेनेज लाईन काढून नवीन 225 मी.मी. व्यासाची एसडब्ल्यूजी ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सुंदर कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 187 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.38 बंजारा कॉलनी, बापुनगर भागातील अंतर्गत गल्ल्यात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.13,50,361/- चे असून या कामाची ई-निविदा विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आल्या असता, एकूण दोन निविदापत्रके विक्री झाले व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदापत्रके प्राप्त झाले. सदर कामाच्या निविदांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | 21.00 % कमी दराने |
| 2. | राणा कन्स्ट्रक्शन | 15.99% कमी दराने |

तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.टेंभुर्णीकरण प्रल्हाद सुरेश यांची असून ती अं.प.दरापेक्षा 21% कमी दराने आहे. सदर दरास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समितीची मंजुरी घेणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी श्री.टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची अं.प.दरापेक्षा 21% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.38 बंजारा कॉलनी, बापुनगर भागातील अंतर्गत गल्ल्यात पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी व अं.प.दरापेक्षा 21% कमी दराची श्री. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 188 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोशनगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणे या कामासाठी तिसऱ्या वेळेस बोलाविण्यात आलेल्या निविदांपैकी मे.गायत्री आर्कीटेक्ट यांच्याकडून सदरील काम अं.प.दराच्या 15% जास्त दराने करून घेण्यात येत असून सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.11,93,975/- एवढी होती. परंतु प्रत्यक्ष काम करतांना इन्टॅक या ऐतिहासिक वास्तुच्या संबंधी संस्थेच्या वास्तुतज्ञांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचविलेल्या काही बदलांमुळे कामात काही अतिरिक्त बाबी होत असून यामुळे कामात रक्कम रू.7,86,430/- ची अतिरिक्त वाढ होत असून त्यामुळे सदर कामाची सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,80,405/- एवढी होत असून सदर कामावरील अतिरिक्त बाबींचे काम संबंधीत गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेणेच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती सभेची मंजुरी घेणेस्तव आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक अतिरिक्त बाबींसह रक्कम रू.19,80,405/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरूस्ती करणेच्या या कामासाठी वास्तुतज्ञांनी प्रत्यक्ष स्थळावर सुचविलेल्या काही बदलांमुळे कामात काही अतिरिक्त बाबींमुळे रक्कम रू. 7,86,430/- ची वाढ होत असल्याने या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,80,405/- ला तसेच अतिरिक्त बाबींचे काम अंदाजपत्रकीय दराने या कामाचे मुळ गुत्तेदार मे.गायत्री आर्कीटेक्ट यांचेमार्फत करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 189 :**

कार्यकारी अभियंता(ज.नि., वि.इ. व उ.) प्रस्ताव सादर करीत आहे की, उर्जा बचतीसाठी शहरातील मुख्य रस्त्यावर T-5 टेक्नॉलॉजीचे 4 x 24 Watt चे 5000 उर्जा बचत दिवे लावण्यात आलेले आहेत. त्यातुन उर्जा बचत होत असून महानगरपालिकेचा चांगलाच फायदा होत आहे. अशाच प्रकारचे आणखी 5000 दिवे सिडको भागात लावण्यासाठी स.सदस्यांनी वेळोवेळी मागणी केलेली होती, त्यानुसार सर्वसाधारण सभा दि.29.3.2007 रोजी ठराव क्र.781/1 नुसार सिडको व उर्वरीत शहरात 5000 अतिरिक्त दिवे पुर्वीच्याच एजन्सीकडून पुर्वीच्याच अटी-शर्तीनुसार लावण्याचा ठराव मंजुर झालेला आहे.

याबाबत मे. विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांच्या प्रतिनिधीकडे विचारणा केली असता त्यांनी नविन अतिरिक्त 5000 उर्जा बचत दिवे खालील अटींवर लावण्याचे मान्य केले आहे.

1. एनर्जी सेव्हींग फिटींग लावल्यामुळे जी उर्जा बचत होईल व त्यामुळे मनपास जे कार्बन क्रेडिट मिळेल ते विकून त्यातुन जे उत्पन्न येईल त्या उत्पन्नाचा 77% भाग मे. विनवॉक सिस्टीम्स् यांना व 23% भाग मनपास देण्यात येईल.

2. कार्बन क्रेडिट हे शहरात लवण्यात आलेले 5000 दिवे व अतिरिक्त लावण्यात येणारे 5000 असे एकूण 10000 पथदिवे यासाठी राहील.

या बाबत मा. आयुक्त यांच्या दालनात झालेल्या वाटाघाटी नुसार असे ठरले की, 10000 दिव्यांमुळे होणाऱ्या विज बचतीतून मिळणारे कार्बन क्रेडिट विकुन त्यातून प्राप्त उत्पन्नाचा 50% भाग मे. विनवॉक सिस्टीम्स्, नाशिक या एजन्सीला व 50% महानगरपालिकेस देण्यात यावा. तसेच यासाठी जी कार्यवाही करण्यात येईल, त्यासाठी लागणारा सर्व खर्च मे. विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांनी करावा असे ठरले व त्यास मे. विनवॉक सिस्टीम्स, नाशिक यांनी संमती दिली आहे.

करीता सिडको व उर्वरीत शहरात T-5 टेक्नॉलॉजीचे 4 x 24 Watt चे 5000 उर्जा बचत दिवे पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार मे. विनवॉक सिस्टीम्स् यांचेकडून लावून घेण्यास व त्यामुळे एकूण 10000 दिव्यांचे कार्बन क्रेडिट विकुन होणाऱ्या उत्पन्नातुन 50% भाग मे. विनवॉक सिस्टीम्स्, नाशिक यांना देण्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : मंजुरी देण्यात येते.

श्री.वसंत नरवडे :सिडको भागात 5000 उर्जा बचत दिवे लावणार आहे यात उर्वरीत दिले, जुन्या शहरात लावणार आहे काय? कार्बन क्रेडिटचे 5000 दिवे शहरात कूठे लावणार आहे. एनर्जी सेव्हींग किती झालेली आहे याचा रेकॉर्ड ठेवलेला आहे का?

कार्य.अभियंता(वि.) : यापूर्वी 5 हजार एनर्जी सेव्हिंग दिवे पूर्ण शहरात लावलेले आहे. सिडकोच्या स. सदस्यांची सिडको भागात असे दिवे लावावे म्हणून मागणी होती. आता सिडको भागात लावणार आहोत. त्यानुसार सर्वसाधारण सभेत ठराव झालेला आहे त्याचा संदर्भ पण दिलेला आहे.जे शिल्लक राहतील ते जुन्या शहरातच मुख्य रस्त्यावर लावणार आहे यापूर्वी लावलेले दिवे संदर्भात किती एनर्जी सेव्हिंग होते याचा रेकॉर्ड ठेवलेला आहे.60 ते 62 टक्के बचत होत आहे.

श्री.मधुकर सावंत : एक ते दीड वर्षापासून उर्जा बचत दिवे लावण्याची कार्यवाही होत आहे.महापालिकेला किती फायदा झालेला आहे.

कार्य.अभियंता (विद्यु.) : पूर्वी किती बिल येत होते आता किती येते याची पाच मिनिटात माहिती मागवून सादर करण्यात येईल.

मा.सभापती : माहिती मागविण्यात यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उर्जा बचतीसाठी शहरातील मुख्य रस्त्यावर T-5 टेक्नॉलॉजीचे 4 x 24 Watt चे उर्जा बचत दिवे लावण्याचे कामाकरीता, सिडको व उर्वरीत शहरात T-5 टेक्नॉलॉजीचे 4 x 24 Watt चे 5000 उर्जा बचत दिवे पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार मे. विनवॉक सिस्टीम्स् यांचेकडून लावून घेण्यास व त्यामुळे एकूण 10000 दिव्यांचे कार्बन क्रेडिट विकुन होणाऱ्या उत्पन्नातुन 50% भाग मे. विनवॉक सिस्टीम्स्, नाशिक यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 190 :**

कार्यकारी अभियंता (ज.नि.,वि.इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील व वॉर्डातील विविध रस्त्यांवर पथ दिवे लावण्यासाठी अंदाजपत्रके मंजुर झालेली असून सध्या काही अंदाजपत्रके निविदा अंतर्गत आहेत. त्यासाठी लागणाऱ्या फिटींगचे 2 x 24 Watt, 4 x 24 Watt, 5 x 24 Watt चे एकत्रिकरण करून एकच अंदाजपत्रक रक्कम रू.90.96 लक्षचे तयार केले आहे व त्यास दि.20.2.2007 च्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.708 नुसार मान्यता मिळालेली आहे. अशा प्रकारे एकत्र खरेदी करून सर्व कामांसाठी खात्यातर्फे फिटींगचा पुरवठा करावा असे सर्वसाधारण सभेत अर्थसंकल्पास मंजुरी देतांना ठरले आहे.

त्यानुसार सदर कामाची निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई/नि/117/07 अन्वये प्रसिध्दीस दिली असता एकुण तीन निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिवशी तीन निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | फिटींगचा प्रकार | प्राप्त झालेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1. | मे. शक्ती फिक्चर्स इंडस्ट्रीज, मुंबई | 2x24 Watt | **3981.00** | L-1 |
| | | 4x24 Watt | 5881.00 | |
| | | 5x24 Watt | **6581.00** | L-1 |
| 2. | मे. एशियन इले. लि. | 2x24 Watt | 4182.00 | |
| | | 4x24 Watt | 6030.00 | |
| | | 5x24 Watt | 6685.00 | |
| 3. | मे. विनवॉक सिस्टीम, नाशिक | 2x24 Watt | 4182.00 | |
| | | 4x24 Watt | **5400.00** | L-1 |
| | | 5x24 Watt | 6684.00 | |

वरील तपशील पाहता मजूर झालेल्या विविध कामांतर्गत 2 x 24 Watt, 4 x 24 Watt, 5 x 24 Watt चे उर्जा बचत दिवे लावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये ज्या संचिकेत 5 x 24 Watt चे दिवे लावण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, त्यात या दिव्यांऐवजी 4 x 24 Watt चे दिवे लावल्यास अधिक उर्जा बचत होईल तसेच दिव्यांचा प्रकाशही पुरेसा राहील असे ठरल्यामुळे 5 x 24 Watt दिव्यांची खरेदी करण्याऐवजी 4 x 24 Watt दिव्यांची खरेदी करण्याचे ठरले आहे. त्यानुसार फकत 2 x 24 Watt चे दिवे(फिटींग) आणि 4 x 24 Watt चे दिवे (फिटींग) खरेदी करण्याच्या दृष्टीने तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराच्या निविदा खालील प्रमाणे आहेत.

1. मे. शक्ती फिक्चर्स इंडस्ट्रीज, मुंबई 2 x 24 Watt **3981.00** प्रती नग
2. मे. विनवॉक सिस्टम, नाशिक 4 x 24 Watt **5400.00** प्रती नग

2 x 24 Watt प्रकारच्या फिटींग्ज मध्ये मे. शक्ती फिक्चर्स इंडस्ट्रीज, मुंबई यांचे दर सर्वात कमी आहेत. 4 x 24 Watt च्या फिटींग्ज मध्ये मे. विनवॉक सिस्टम, नाशिक यांचे दर सर्वात कमी आहेत.

वरील दोन्ही एजन्सी सोबत मा. आयुक्त यांच्या दालनात वाटाघाटी केल्या असता मे. शक्ती फिक्चर्स इंडस्ट्रीज यांनी फिटींगची गॅरंटी देण्यास नकार दिला, मात्र मे. विनवॉक सिस्टम यांनी तीन वर्षाची गॅरंटी देण्यास संमती दर्शविली.

म्हणुन 2 x 24 Watt फिटींगमध्ये मे. शक्ती फिक्चर्स इंडस्ट्रीज, मुंबई यांचे दर सर्वात कमी असले तरी त्यांनी वाटाघाटीच्या वेळी तीन वर्षाची गॅरंटी न दिल्यामुळे त्यांच्या दरांचा विचार करण्यात आला नाही. त्यामुळे मे. विनवॉक सिस्टम यांना विचारणा केली असता, ते मे.शक्ती फिचर्स इंडस्ट्रीज, मुंबई यांच्या दरातच तीन वर्षाच्या गॅरंटीसह फिटींगचा पुरवठा करण्यास तयार आहेत. म्हणुन दोन्ही प्रकारच्या फिटींग मे. विनवॉक सिस्टम, नाशिक यांचेकडून पुरवठा करण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

करिता मे. विनवॉक सिस्टीम, नाशिक यांचेकडून 2 x 24 Watt चे 1000 फिटींग रूपये 3981/- प्रती नग व 4 x 24 Watt च्या 900 नग उर्जा बचत फिटींग पुरवठा रूपये 5400/- प्रती नग या दराने करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील व वॉर्डातील विविध रस्त्यांवर पथदिवे लावण्यासाठी आवश्यक असणाऱ्या फिटींग पुरविण्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी, 4 x 24 Watt च्या फिटींग्ज मध्ये मे. विनवॉक सिस्टम, नाशिक यांचे दर सर्वात कमी असल्याने व मे. विनवॉक सिस्टीम, नाशिक यांनी वाटाघाटीचे वेळी 2 x 24 Watt फिटींगसाठी तीन वर्षाची गॅरंटी दिल्यामुळे मे. विनवॉक सिस्टीम, नाशिक यांचेकडून 2 x 24 Watt चे 1000 फिटींग रूपये 3981/- प्रती नग व 4 x 24 Watt च्या 900 नग उर्जा बचत फिटींग पुरवठा रूपये 5400/- प्रती नग या दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 191 :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.लेखाऊ 10 2004/71/प्रक्र5/04/नवि-5/04 नवि-31 दि. 6 जुलै 2005 नुसार राज्यातील सर्व 'ब' व 'क' वर्ग महानगरपालिकांना दुहेरी नोंद लेखा पध्दतीनुसार लेखे ठेवावयाचे व त्यासाठी महानगरपालिकेची चल व अचल संपत्तीचे माहिती फॉर्म 1 ते 15 मध्ये माहिती ठेवणे अनिवार्य केलेले आहे.

त्यासाठी वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दी देण्यात आली होती व या कामासाठी मे. सिमा कन्सल्टंट, औरंगाबाद व मे. एस.बी.एस.असोसिएटस्, औरंगाबाद यांनी सहभाग नोंदविला होतो व त्यांचेकडून सिलबंद लखोट्यात दर मागविण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणेचे दर दिलेले होते.

| अ.क्र. | मुल्यांकन रक्कम | मे.सिमा कन्सल्टंट | मे.एस.बी.एस.असोसिएटस् |
|---|---|---|---|
| 1. | रू. 300 कोटी पर्यंत | रू.300/- प्रती लक्ष | -- |
| 2. | रू. 500 कोटी पर्यंत | -- | रू.250/- प्रती लक्ष |
| 3. | रू. 600 कोटी पर्यंत | रू.225/- प्रती लक्ष | -- |
| 4. | रू. 1000 कोटी पर्यंत | रू.200/- प्रती लक्ष | रू.200/- प्रती लक्ष |
| 5. | रू. 1000 कोटी पेक्षा जास्त | रू.150/- प्रती लक्ष | रू.150/- प्रती लक्ष |
| 6. | रू. 3000 कोटी पर्यंत | -- | रू.100/- प्रती लक्ष |

उपरोक्त प्रमाणेच्या दरात सर्व संबंधीतास दि.22.10.2007 रोजी वाटाघाटीसाठी बोलावणेत आले असता मा.आयक्तांच्या दालनात परिपुर्ण चर्चा होऊन कामाची निकड लक्षात घेता उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले दर जास्त वाटत असल्यामुळे त्या दरात वाटाघाटी करून खालीलप्रमाणेचे दर निश्चित करण्यात आले असून निविदा धारकांनी त्यास संमती दिलेली आहे.

वाटाघाटी अंती महानगरपालिकेच्या सर्व चल अचल संपत्तीचे सर्वेक्षण व मुल्यांकन करणे करीता एकत्रित मोबदला रू.24.00 लक्ष + सेवाकर किंवा रू.100.00 प्रती लक्ष मुल्यांकन दर, या दराने, पैकी जी रक्कम कमी येईल त्या रक्कमेत दोन्ही एजन्सीने एकत्रित काम करावे. कार्यालयाने पुरविलेल्या यादीत भविष्यात वाढ झाल्यास किंवा नविन मालमत्ता निर्माण झाल्यास त्याचे पण सर्वेक्षण व मुल्यांकन करणे याचा पण उपरोक्त दराने समावेश राहील त्यासाठी कोणतेही अतिरिक्त दर देय होणार नाही.

करीता उपरोक्त प्रमाणेचे चल अचल संपत्तीचे सर्वेक्षण व मुल्यांकन वाटाघाटी अंती ठरलेल्या दराला उपरोक्त एजन्सीकडून करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.लेखाऊ 10 2004/71/प्रक्र5/04/नवि-5/04 नवि-31 दि. 6 जुलै 2005 नुसार महानगरपालिकेच्या सर्व चल अचल संपत्तीचे सर्वेक्षण व मुल्यांकन करणेकरीता वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे, एकत्रित मोबदला रू.24.00 लक्ष

+ सेवाकर किंवा रू.100.00 प्रती लक्ष मुल्यांकन दर, या दराने, पैकी जी रक्कम कमी येईल त्या रक्कमेत मे.सिमा कन्सल्टंट मे.एस.बी.एस.असोसिएटस् दोन्ही एजन्सीकडून एकत्रित काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 192 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यान येथे खेळणी बसविणे करीता रक्कम रू.13,20,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपरोक्त कामास्तव कार्यालयीन निविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/102/2007 दि.8.10.2007 अन्वये निविदा मागविले असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत 2 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

1. अरिहंत इंडस्ट्रीयल कॉर्पोरेशन लि. - अंदाजपत्रकीय दराने
2. स्काय इंटरप्रायजेस - निविदेतील अटी शर्तीनुसार केलेल्या कामांचे प्रमाणपत्र निविदेसोबत सादर न केल्याने निविदा उघडण्यात आलेली नाही.

त्यानुसार अरिहंत इंडस्ट्रीयल कॉर्पोरेशन लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा प्रस्ताव मान्येस्तव स्थायी समितीकडे सादर करणे बाबत मा. आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार अरिहंत इंडस्ट्रीयल कॉर्पोरेशन लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे खेळणी बसविणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.अरिहंत इंडस्ट्रीयल कॉर्पोरेशन लि. यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 193 :**

उप आयुक्त(प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका ग्रंथालयासाठी मराठी, हिंदी, उर्दू व इंग्रजी साहित्य/पुस्तके खरेदीस्तव पुस्तक खरेदीवर सर्वाधिक सुट देणाऱ्या पुस्तक पुरवठाधारकाकडून "सर्वाधिक सूट" देणारे दर मागविण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रातून जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. निविदा विक्रीच्या अखेरच्या दिनांकापर्यंत पाच निविदा विकल्या गेल्या आणि निविदा सादर करावयाच्या अखेरच्या दिनांकापर्यंत 5 निविदा प्राप्त झाल्या. ग्रंथालयात व वाचनालयात वर्षभर विविध पुस्तके/साहित्य खरेदी करणेस्तव या निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा धारकांनी दर्शविल्या "सर्वाधिक सूट" संदर्भात सर्व निविदाधारकांशी चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्व साहित्य प्रकारावर निम्ननिर्देशित "सर्वाधिक सूट" देणेचे पुरवठाधारकांनी मान्य केले.

| अ.क्र. | ग्रंथ प्रकार | निविदा सर्वाधिक सुट | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मिनर्व्हा बुक डिस्ट्रीब्युटर | जिवनग्रंथ वितरण | परिमल प्रकाशन | जनशक्ती पब्लिकेशन | श्री उद्योग |
| अ | **ललित साहित्य** | | | | | |
| | मराठी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | हिंदी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | इंग्रजी | 8% | -- | -- | -- | -- |
| | उर्दू | -- | 12% | 12% | 12% | 12% |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ब | **संदर्भ ग्रंथ** | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | हिंदी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | इंग्रजी | 8- | -- | -- | -- | -- |
| | उर्दू | | 12% | 12% | 12% | 12% |
| **क** | **क्रमिक पुस्तके** | | | | | |
| | मराठी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | हिंदी | -- | 15% | 15% | 15% | 15% |
| | इंग्रजी | 8% | -- | -- | -- | -- |
| | उर्दू | -- | 12% | 12% | 12% | 12% |
| **ड** | शासकीय प्रकाशने | -- | -- | -- | -- | -- |
| **इ** | लॉ बुक्स | -- | 5% | 5% | 5% | 5% |
| **ई** | दिवाळी अंक | -- | -- | -- | -- | -- |

उपरोक्त पुस्त खरेदीवर सर्वाधिक सुट देणारे दर दर्शविण्यात आले आहेत. सदरील पुस्तके/वाचन साहित्य याकरीता सन 2007-08 च्या अर्थसंकल्पाचा रू.17/- लक्ष एवढी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे. सदरील तरतुदीच्या अधिन राहून वर्षभरात पुस्तक पुरवठाधारकांकडून मान्य असलेल्या "सर्वाधिक सूट" दरांपेक्षा कमी नाही या तत्वावर वेळोवेळी पुस्तक खरेदी करणेत येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी :17 लक्षची मंजूरी घेत आहे जेंव्हा केंव्हा पुस्तके लागतील त्तेंव्हा घेणार आहे. नामवंत लेखकाचे , इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी , क्रमिक पुस्तके दिले कोणत्या वर्गाची व इतर कोणती पुस्तके घेणार आहे साहित्यात असा प्रकार असतो की जे पुस्तके कुठेच विकली जात नाही त्यांना बाहेर मार्केट नाही कदाचित ती पुस्तके खरेदी होतील यात सुट देण्या बाबत जी टक्केवारी दिली जर ती पुस्तके बाजारात विकलीच जात नसेल तर 50 टक्के जरी सुट दिली तरी फायदयाचे नाही्.यात प्रकाशनाची नावे दिलेली आहे पुस्तकाची नावे नाही. या प्रकाशनाने कविताचे पुस्तक प्रशाशित केले तर त्ते 15 टक्के सुट देवून देतात म्हणून तेच खरेदी करणार काय सविस्तर खुलासा व्हावा.

उपआयुक्त (प्र.) : ग्रंथ खरेदीसाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात 17 लक्षची तरतूद आहे.यात ग्रथ कोणते आवश्यक आहे या बाबत मुख्य वाचनालयामध्ये वाचकांना कोणती पुस्तके आवश्यक आहे त्यासाठी डिमांड रजिस्टर ठेवलेले आहे.त्यानूसार सर्वसाधारण नागरीकांच्या काय आवडी आहेत काही नागरीकांनी ऑनलाईन्स आवश्यकता असलेल्या पुस्तकाच्या डिमांड आलेल्या आहेत. स्टेटमेंन्ट करून मराठी, उर्दू, इंग्रजी आवश्यक ती पुस्तके सभागृहासमोर सादर केलेले आहे.

श्री.संजय जोशी : छावा तसेच कबीरांचे दोहे संदर्भात पुस्तके आहेत. त्या प्रकाशनाचे यात नावच नाही डिमांड रजिस्टर नुसार कुणीच हे पुस्तकाची मागणी केलेली नाही का? जनशक्ती पब्लीकेशन मध्ये प्रकाशित झालेले पुस्तका शिवाय कोणताही प्रकाशन 15 टक्केची सुट देवून पुस्तक देवू शकणार नाही.या चारच प्रकाशनानी 15 टक्के कमी केले मॅजीस्टीक प्रकाशन यानी कमी रेट करून पाठविले नसेल कारण त्यांचे पुस्तकाला जास्त डिमांड ,वाचक आहेत. डॉ. अबुल कलाम आझाद यांचे पुस्तक मिळणार नाही. यातील एकाही प्रकाशकाकडे ते नाही. ज्या पुस्तकाची मागणी करू ते पुस्तक हे प्रकाशक 15 टक्के रेट कमी करून देण्यास तयार असतील तर ठिक

आहे. नसता ज्यांना साहित्याची, वाचनाची आवड तसेच सखोल अभ्यास आहे अशा 5 लोकाची कमेटी करावी. आवश्यक पुस्तके खरेदी करावे नसता कालातंराने अवाचनीय पुस्तकांचे गठ्ठे धुळखात पडतील. खराब होवू नये म्हणून औषध फवारणीसाठी खर्च लागेल. त्यासाठी वाचनीय पुस्तके खरेदी करावी

श्री.वसंत नरवडे : वाचनीय पुस्तके घ्यावी एकच पुस्तक दुस-यांदा खरेदी होणार नाही याची दखल घ्यावी.

सहा. ग्रथंपाल : या वर्षी 17 लक्षचे बजेट यासाठी आहे. मराठी ,इंग्रजी,हिन्दी तसेच उर्दु अशी चार भाषीक पुस्तके घेत आहोत. मराठी भाषेतील पुस्तके सात आठ वाचनालयात जातात. उर्दु वाचनालयात उर्दु भाषीक हजरत निजामोद्यीन दर्गाह येथील वाचनालयात तर इंग्रजी भाषेतील पुस्तके ही लोटांकारंजा येथील वाचनालयात दिली जातात. यात एमबीबीएस, पीएचडी, इजिनिअरींग अशी अभ्यासाची पुस्तके घेतली जातात.दर वर्षी वाचकाची डिमांड यादी विचारात घेवून खरेदी केली जाते. या वर्षी ऑनलाईनवरून ही काही नावे घेतलेली आहे.

श्री.संजय जोशी : सर्वाधिक सुट देणारे चार प्रकाशक यात दिले ललित साहित्य तसेच संदर्भ ग्रंथ ही पुस्तके हे प्रकाशक कोणत्याही प्रकाशकाची पुस्तके 15 टक्के, इंग्रजीचे इजिनिअरींगचे 8 टक्के सूट देतील का स्पष्ट खुलासा करावा? मॅजेस्टीकचे पुस्तके मिनर्वा देणार का? हक्कप्रकाशकाकडे असतात.

सहा.ग्रथंपाल : जी पुस्तके येथे मिळत नाही ती बाहेरून मागविली जातात. ललित साहित्य ,संदर्भ ग्रंथ ही पुस्तके कोणत्याही प्रकाशकाची हे प्रकाशक 15टक्के सुट देवून देतील.

श्री.अ.रशिद खान : तज्ञ लोकांची कमेटी करावी त्यानंतर निर्णय घ्यावा तोपर्यत स्थगिती द्यावी.

मा.सभापती : हा विषय तुर्त स्थगित करण्यात येत आहे या संदर्भात एक कमेटी करून कोणकोणती पुस्तके खरेदी करण्याची गरज आहे याचा अहवाल पूढील बैठकीत देतील त्या कमेटीत स.सदस्य श्री संजय जोशी, श्री.वसंत नरवडे, डॉ.आशा बिनवडे, श्री. कचरू मोरे तसेच नगरसचिव व प्रशासनाचे अधिकारी राहतील.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो. कोणती पुस्तके खरेदी करण्याची गरज आहे यासंदर्भात अहवाल देण्यासाठी स.सदस्य श्री.संजय जोशी, श्री.वसंत नरवडे पाटील, डॉ.आशा बिनवडे, श्री.कचरू मोरे व नगर सचिव यांची कमिटी स्थापन करण्यात येते.

**विषय क्र. 194 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा प्रस्ताव सादर करीत आहेत की, एन-8 भागात महानगरपालिकेच्या दवाखान्याच्या मागील बाजुस 15 लाख लिटर्स क्षमतेचे जलकुंभ बांधण्याचे काम सुरू आहे. एन-8 भागात नवीन जलकुंभ भरण्यासाठी एन-7 पंप हाऊस ते एन-8 नवीन जलकुंभा पर्यंत 300 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे दरसुची सन 2005-06 नुसार र.रू.38,74,710/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.513 दि.13.10.2006 अन्वये मान्यता झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी ई-टेंडरींग मार्फत फेरनिविदा मागविली असता विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एक निविदा प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. श्री.सुरेश बी. साधवानी - 37.50% जास्त दराने

प्राप्त निविदा श्री.सुरेश बी. साधवानी यांची असून अं.प.दरापेक्षा 37.50% जास्त दराची निविदा स्विकारणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-8 भागात नवीन जलकुंभ भरण्यासाठी एन-7 पंप हाऊस ते एन-8 नवीन जलकुंभा पर्यंत 300 मी.मी. व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेली श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 37.50% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 195 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे भाग-1, सुशोभिकरण करणे, संरक्षित भिंतीचे काम करणे, लँड स्केपींग करणे, टॉयलेट ब्लॉक बांधणे इत्यादी व इतर कामे करण्याकरीता सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.50.00 लक्ष च्या प्रथम टप्प्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास सर्वसाधारण सभेने ठराव क्र.260/2दि.24.5.2006 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार टप्पा क्र.1 भाग-1 मधील विविध कामा करीता निविदा रक्कम रू.23,28,512/- करीता निविदा मागविण्यात आल्या असता एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराच्या निविदेस स्थायी समितीने ठराव क्र.111 दि.26.9.2006 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार काम प्रगतीपथावर असुन ऐतिहासिक स्वरूपाचे काम असल्याने काम चालू असतांना नविन बाबी निदर्शनास येत असल्यामुळे कामात वाढ होत आहे. यामध्ये इमारतीच्या बाजुने Strom water gutter व जाळी बसवून आतील बाजुस flooring करणे, ग्रील बसविणे, रेलींग बसविणे, रेन वॉटर पाईप बसविणे तसेच इमारतीच्या आत व परिसरात रेड आग्रा flooring करणे, ढोलपुरी रायझर बसविणे इत्यादी विविध कामे करणे असुन या कामास्तव रक्कम रू.14.60 लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदरील खर्चास मान्यता घेणेस्तव व सदरील काम कामाचे मुळ गुत्तेदार एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने करून घेणेस्तव मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाची वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रू.14.60 लक्ष व सदरील काम कामाचे मुळ गुत्तेदार एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : अंडरग्राऊंडचे काम असते तर किती खर्च लागेल समजले नसेल. परंतू जमिनीवरील कामासाठी पुन्हा जास्तीचा खर्चाचा प्रस्ताव येतो खुलासा घ्यावा.

कार्य.अभियंता(इ.) : सुरूवातीला निधी कमी होता म्हणून कॉम्प्रेसिव्ह नियोजन तयार केले होते सदर एजन्सीचे कामा आता चालू झाले. फ्लोरींग करण्याचे ठरले त्यावर कमेटी करण्यात आली त्या कमेटीच्या सांगण्यावरून फ्लोरींगचे काम करायचे आहे. कमेटीत पुरातत्व खात्याचे कर्मचारी होते.

श्री.वसंत नरवडे : पुर्वीचे या ठेकेदाराचे मंजूर दर काय होते.

कार्य.अभियंता(इ.) : मुळ दर सुध्दा जास्तीचे आहे.

श्री.संजय जोशी : प्रशासन जे जास्त दराने करून त्यास मंजूरी दिली जाते. सदस्यांच्या वार्डातील 2, 5, 10 टक्केनी जास्तीचे काम होत असेल तर त्यास मंजूरी होण्यास 2 महिण्याचा कालावधी जातो. उदा. वॉर्डातील डांबरीकरणाचे काम असेल व पूढील दोन पाच घरा समोर रस्त्याचे कामाचे इस्टिमेंट राहिले असेल तर त्यास जास्तीचे काम करायचे म्हणून मान्यता आहे का?

श्री.वसंत नरवडे : स.सदस्यांनी सांगण्यानूसार किंवा प्रशासनाला 67 (3) नुसार जी तातडीची कामे करण्याची गरज पडत आहे ती ई टेंडरींगच्या रेट प्रमाणे होत असून 42,38 टक्के

जास्त दराने मंजूर करीत आहोत.एखादे 38 टक्के अबाऊ काम आले तर ते प्रशासन करील का या कामाचे अल्प मुदतीची निविदा मागवली असती तर दुसरे गुत्तेदाराने टेंडर भरले असते.पुर्वीच्याच गुत्तेदाराकडून त्याच रेट मध्ये हे काम करून घेण्याचे कारण काय ही तफावत का प्रशासन निर्माण करते.

श्री.मधुकर सावंत : रमानगर येथे् खुल्या जागेला संरक्षित भिंत तातडनीचे बांधावी म्हणून सभागृहात मागणी केली होती मा. आयुक्त यांनी तसे आदेश ही अधिका-यांना दिले सदर काम शॉर्ट टेंडर मध्ये घेतले काम तात्काळ झाले नाही त्यामूळे अतिक्रमण झाले. जागा महापालिकेच्या ताब्यातून गेली आहे. नगरसेवकांनी सांगितलेली कामे होत नाही प्रशासनाने पाठविलेली कामे फार स्वच्छ असतात म्हणून मंजूरी होते.असा प्रकार चालू आहे. मोठया रक्कमेचे काम आहे ईटेंडरींग मध्ये द्यावे.

श्री.वसंत नरवडे : त्याच ठेकेदारास हे काम का दिले जात आहे ई टेडरींग मध्ये का टाकले जात नाही.

श्री.अ.रशीद खान : यात ग्रील बसविणे रेंलींग बसवीणे असे दिले अंदाजपत्रक तयार करतांना जे अधिका-यांच्या का लक्षात आले नव्हते.

श्री.मधुकर सावंत : यात फ्लोरींग करणे, ढोलपुरी रायझर बसविणे, हे आधी अंदाजपत्क्र तयार करतांना अधिका-यांच्या लक्षात आले नाही का?

मा.सभापती : हा विषय मंजूर करण्यात येतो, परंतू स. सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे इतरही वार्डातील कामे करतांना वाढीव काम करण्याची गरज पडल्यास त्या संदर्भात तातडीने प्रशासनाने कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात येतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका टाऊन हॉल इमारतीचे जतन करणे भाग-1 च्या सुरू असलेल्या कामांतर्गत, काम चालू असतांना नविन बाबी निदर्शनास आल्याने कामात वाढ होत असल्यामुळे, इमारतीच्या बाजुने Strom water gutter व जाळी बसवून आतील बाजुस flooring करणे, ग्रील बसविणे, रेलींग बसविणे, रेन वॉटर पाईप बसविणे तसेच इमारतीच्या आत व परिसरात रेड आग्रा flooring करणे, ढोलपुरी रायझर बसविणे इत्यादी विविध कामे करणे साठी वाढीव अंदाजपत्रकीय रक्कम रू.14.60 लक्षच्या वाढीव रक्कमेस तसेच सदरील काम या कामाचे मुळ गुत्तेदार एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 19% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**संवाद :**

मा.सभापती **:** ऐनवेळी काही अंदाजपत्रकाचे प्रस्ताव आलेले आहेत, नगरसचिव वाचून दाखवतील. त्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.196 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.4 अंतर्गत एन-13 वानखेडेनगर, महेबुबपुरा मध्ये 200, 225, 300 मी.मी. व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी जिल्हा दरसुची 2006-07 नुसार रक्कम रू.11,74,800/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास दि.31.10.07 नुसार मा. आयुक्त यांनी स्थायी समित समोर सादर करण्यासाठी शिफारस केलेली आहे.

सदर काम हे गुंठेवारी अंतर्गत जमा झालेल्या रक्कम रू.11,74,800/- मधून प्रस्तावित आहे. करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.11,74,800/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.4 अंतर्गत एन-13 वानखेडेनगर, महेबुबपुरा मध्ये 200, 225, 300 मी.मी. व्यासाची एसडब्ल्युजी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,74,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 197 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.55 मो. कैसर कॉलनी येथे नॅशनल बांबु ते श्री.हमीद खान यांचे घर ते ए-1 बकरा मटन शॉप ते चंपा चौक, यंपा मस्जीद ते लोकमान्य ब्लड बँक पर्यंत मुख्य रस्त्यालगत सीआरएस गटार बांधून त्यावर आरसीसी स्लॅब कव्हर करणे या कामाचे एकूण अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून र.रू.44,60,000/- च्या अंदाजपत्रकास आणि सध्या उपलब्ध झालेल्या रक्कम रू.30.00 लक्ष चे पहिल्या टप्प्याचे भाग-अ काम करणेस सर्वसाधारण सभा विषय क्र.925 दि.18.7.2007 अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. भाग-ब रक्कम रू.14,60,000/- चे उर्वरीत काम अर्थ तरतुद उपलब्धतेनुसार करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा विक्री झाली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा दर भरून प्राप्त झाली असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**1) मे. असेण्ड कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा 4.79% कमी दराने**

अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.79% कमी दराची निविदा मे. असेण्ड कन्स्ट्रक्शन यांची आहे. त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. तरी मे. असेण्ड कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 4.79% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.55 मो. कैसर कॉलनी येथे नॅशनल बांबु ते श्री.हमीद खान यांचे घर ते ए-1 बकरा मटन शॉप ते चंपा चौक, यंपा मस्जीद ते लोकमान्य ब्लड बँक पर्यंत मुख्य रस्त्यालगत सीआरएस गटार बांधून त्यावर आरसीसी स्लॅब कव्हर करणे या कामासाठी प्राप्त झालेली मे. असेण्ड कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 4.79% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.198 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, टाऊन हॉल इमारतीतील विद्युतीकरणाची कामे करणेसाठीचे अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन 2007-08 च्या दरसुची नुसार रक्कम रू.20,53,126/- चे तयार करण्यात आले असून सदर कामाचा खर्च बाराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीमधुन प्रस्तावित केलेला आहे. त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. करीता सदर कामाची निविदा सुचना जा.क्र./मनपा/ई/निविदा/95/07 दि.1/10/07 अन्वये दैनिक लोकमत, लोकसत्ता, पुणे संजयवार्ता, लोकपत्र संजयवार्ता मध्ये प्रसिध्दीस दिली असता निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकापर्यंत

एकुण पाच निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकात एकुण पाच (5) निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. शांती इलेक्ट्रीकल्स | 27.65% कमी दराने |
| 2. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | 25.55% कमी दराने |
| 3. | मे. असन्सो लाईटस् | 19.78% कमी दराने |
| 4. | मे. सत्यम वायर्स, औरंगाबाद | 16.51% कमी दराने |
| 5. | मे. ओसामा इलेक्ट्रीकल्स | 1.10% कमी दराने |

उपरोक्त प्रमाणे मे. शांती इलेक्ट्रीकल्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.65% कमी दराची निविदा आहे. करीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा 27.65% कमी दराची मे. शांती इलेक्ट्रीकल्स यांची निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊन हॉल इमारतीतील विद्युतीकरणाची कामे करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 27.65% कमी दराची मे. शांती इलेक्ट्रीकल्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.199 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वॉर्ड क्र.62 अंतर्गत म्हाडा कॉलनी, भाग्यनगर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.14,98,050/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.14,98,050/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.62 अंतर्गत म्हाडा कॉलनी, भाग्यनगर येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,98,050/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.200 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.2, मयुरपार्क येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.14,99,600/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात पुनःडांबरीकरण(शहर) या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.14,99,600/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.2, मयुरपार्क येथे विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,99,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.201 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.30 अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.16,99,800/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या

आर्थिक वर्षात नवीन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.16,99,800/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.30 अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे बाबत या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.16,99,800/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.202 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.6 बेगमपुरा येथील पेठेनगर, ब्राम्हणगल्ली इ. ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.18,99,600/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.18,99,600/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.6 बेगमपुरा येथील पेठेनगर, ब्राम्हणगल्ली इ. ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.18,99,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.203 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील त्रिवेणीनगर जवळ आरसीसी पुलाचे काम करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2006-07 च्या दरसूचीनुसार रक्कम रू.17,02,200/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2007-08 या आर्थिक वर्षात दमडी महल उड्डाण पुल बांधणे या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी रक्कम रू.17,02,200/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील त्रिवेणीनगर जवळ आरसीसी पुलाचे काम करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.17,02,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.204 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद ह्यांचे दि.31/7/2007 च्या पत्रानुसार एक नवीन कार मा.सभापती, स्थायी समिती ह्यांचे कार्यालयीन वापरासाठी खरेदी करावयाची आहे. दिनांक 3 ऑक्टोबर 2003 च्या शासन निर्णयाचे अधिन राहुन घसारा निधीतून रू.6.00 लाखाचे मर्यादेतील वाहन खरेदी करण्यास हरकत नाही. त्यानुसार टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स(प्रा.) लिमिटेड, औरंगाबाद ह्यांचे दरपत्रक प्राप्त असून Indigo LXTDI ह्या कारसाठी रू.5,22,610/- चे दर दिले आहेत. सदरील वाहन मनपाचे असल्यामुळे जकातीतून सुट देण्यास मंजुरी मिळावी. इन्शुरन्ससाठी अंदाजे रू.18,000/- चा खर्च इन्शुरन्स ऑफ व्हेइकल्स च्या तरतूदीतून करण्यास मंजुरी मिळावी. सदरील वाहन खरेदी ही घसारा निधीतून करण्यास मंजुरी मिळावी. रू.5,22,610/- च्या खर्चास व वाहन टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स(प्रा.) लिमिटेड, औरंगाबाद ह्यांचेकडून खरेदी करण्याच्या मंजुरीस्तव सादर. वाहनाचे

डिलेव्हरी घेताना किंमतीत कमी वा जास्ती बदल झाल्यास त्याप्रमाणे अदायी करण्यास मंजुरी मिळावी. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.सभापती, स्थायी समिती ह्यांचे कार्यालयीन वापरासाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स(प्रा.) लिमिटेड, औरंगाबाद ह्यांचे प्राप्त दरपत्रकानुसार Indigo LXTDI कार मे.सान्या मोटर्स(प्रा.) लिमिटेड, औरंगाबाद ह्यांचेकडून खरेदी करण्यास, त्यासाठी लागणाऱ्या र.रू.5,22,610/- च्या खर्चासह मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे सदरील वाहन मनपाचे असल्यामुळे जकातीतून सुट देण्यास, इन्शुरन्ससाठी अंदाजे रू.18,000/- चा लागणारा खर्च इन्शुरन्स ऑफ व्हेइकल्स च्या तरतूदीतून करण्यास आणि सदरील वाहन खरेदी ही घसारा निधीतून करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच वाहनाचे डिलेव्हरी घेताना किंमतीत कमी वा जास्ती बदल झाल्यास त्याप्रमाणे अदायी करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.205 :**

दि.7/11/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.155 अन्वये उप अभियंता, सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व दुय्यम आवेक्षक यांना प्रतिमहा रू.500/- वरून प्रतिमहा रू.800/- इतका वाहन भत्ता देण्याची मंजुरी झालेली आहे. त्याप्रमाणेच मनपातील स्वच्छता निरीक्षक यांना देखील साफसफाईचे कामानिमित्त दररोज 50 ते 75 कि.मी. फिरावे लागते. इंधनाच्या वाढलेल्या किंमतीच्या प्रमाणात स्वच्छता निरीक्षकांना देखील प्रतिमहा रू.800/- वाहन भत्ता देण्यात यावा. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सूचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : मोहन मेघावाले, श्रीमती जयश्री किवळेकर

**संवाद :**

मा. सभापती : ठराव क्र.155 अन्वये उप अभियंता, सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व दुय्यम आवेक्षक यांना दि.7/11/2006 पासून प्रतिमहा रू.800/- इतका वाहन भत्ता देण्याची मंजुरी झालेली आहे. त्याच प्रमाणे स्वच्छता निरीक्षकांना देखील प्रतिमहा रू.800/- वाहन भत्ता दि.7/11/2006 पासून देण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि.7/11/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.155 अन्वये मंजुरी झाल्यानुसार ज्याप्रमाणे क.अभियंता, शाखा अभियंता, दुय्यम आवेक्षक यांना प्रतिमहा रू.800/- वाहन भत्ता देण्यात येतो त्याचप्रमाणे मनपातील स्वच्छता निरीक्षकांना देखील दि.7/11/2006 पासून प्रतिमहा रू.800/- वाहन भत्ता देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.संजय जोशी : चाणक्यपूरी भागात मेडीकल एम्प्लॉईज गृह निर्माण संस्था चार एकर जागेत बसलेली आहे. या सोसायटीची मोकळी जागा 13500स्क्वे.मी.रस्त्यासह चाणक्यपूरी ते सुतगिरणी या रस्त्यावर आहे.त्यापैकी 7000 ओ.स्पेस आहे. या ठिकाणी तारेचे कुपंन करावे तेथे महापालिकेचा बोर्ड लावावा. 1987 साली या सोसायटीचा लेआउट मंजूर करतांना सोसायटीबरोबर करारनामा केला होता त्यावेळी सात हजार स्क्वे. मीटर जागा महापालिकेला या सोसायटीने दिलेली आहे. परंतु चार दिवसापूर्वी या जागेवर एका व्यक्तीने माझ्या मालकीची जागा आहे म्हणून बोर्ड लावलेला आहे. सदर जागेचा लेआउट, करारनाम्याची प्रत आपल्याकडे देत आहे आजच्या आज या जागेवर महापालिकेच्या वतीने महापालिकेच्या मालकीची

जागा आहे म्हणून बोर्ड लावण्यात यावा. त्या ठिकाणचे छायाचित्र काढून मालमत्ता विभागास द्यावे. जेणे करून सदर व्यक्तीने न्यायालयात प्रकरण दाखल केले तर महापालिकेकडे हा पुरावा राहील. प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्यामूळे अशा प्रकारच्या जागा खाजगी लोकांच्या घशात जात आहे. तेथे खुली जागा मुलांना खेळण्यासाठी मिळते म्हणून लोकांनी 500 स्क्वे. फुट ऐवजी 1000 स्क्वे. फुटचा प्लॉट विकत घेतलेला आहे. ले-आऊटची प्रत आपल्याकडे देत आहे आजच्या आज तेथील बोर्ड काढण्याचे व त्या जागेला तारकुंपन करण्याचे आदेशीत करावे.

श्री.अ.रशिद खान : ज्या खाजगी व्यक्तीने जागा त्यांची नसतांना बोर्ड लावला त्यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल करावा.

मा.सभापती : या संदर्भात मालमत्ता अधिकारी प्रशासकीय अधिकारी यांनी सदर जागेवर जावून प्रत्यक्ष पाहणी करून जर ती जागा महपालिकेची असेल तर तेथील जे खाजगी व्यक्तीने बोर्ड लावलेले आहे ते काढण्याची कार्यवाही करून महापालिकेच्या नावाने बोर्ड लावून, सबंधीत व्यक्तीने जागा नसतांना बोर्ड कसा लावला त्यांची प्रशासकीय अधिकारी यांनी चौकशी करून त्यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल करावा.

श्री.मधुकर सावंत : बाबा हरदासनगर भागात महापालिकेच्या मालकीच्या ले-आऊट असलेल्या जागेवर एक वॉचमन म्हणून काम करणारा खाजगी व्यक्ती यांनी अतिक्रमण करून परस्पर ती जागा 60 लक्ष मध्ये विकलेली आहे मागिल दोन महिण्यापूर्वी मी या संबधी छायाकिंत प्रत सुध्दा सादर केलेली आहे त्या विषयी प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

प्र. प्रशासकीय अधि. : सदर जागेवर त्यांनी बांधकाम केले आहे, त्यास मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश घेतले आहेत. त्याची प्रत आपणाकडे आहे. स्थगिती असतांना कार्यवाही केली तर मा.न्यायालयाचा अवमान होईल. विधी सल्लागार यांचेकडे संचिका पाठविली.

श्री.मधुकर सावंत : दोन वर्षापूर्वी याबाबत प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. लेआऊटची प्रतही दिलेली आहे. स्थगिती कशी आली, खुल्या जागेमध्ये अनधिकृत बांधकाम आहे. विधी विभागाने त्यापुढे काय कार्यवाही केलेली आहे.

मा.सभापती : विधी सल्लागार यांनी या प्रकरणाची न्यायालयात कुठपर्यत कार्यवाही होत आलेली आहे.

विधी सल्लागार : काल्डा कॉर्नरच्या संदर्भात दोन प्रकरण मा. न्यायालयात चालू होते. एका कामाच्या संदर्भात संबधीत व्यक्तीने डीमड् परमीशनवर मा.न्यायालयाचे जैसे थे आदेश घेतलेले आहे. परंतू जे लिगल वर्क आहे ते पाडू नये परंतू ते लिगल आहे की नाही या बाबत मा. न्यायालयात साक्षी पुरावे वरून स्पष्ट होईल.

श्री.मधुकर सावंत : डीमड् परवानगी काहीही संबंध नाही. त्या व्यक्तीने रितसर लेआउट दाखल केला त्यास मंजूरी घेतली त्या बदल्यात त्यांनी महापालिकेला ओपनस्पेस हस्तांतर केली याबद्दल बोलतो. डीमड् परमीशन वेगळे, ॲग्रीमेन्टची प्रत दिलेली आहे. संबधीताने बांधकाम ओपनस्पेसमध्ये केलेले आहे ते काढण्यात यावे. तेथे कुंपण करावे. महापालिकेच्या नावाचे बोर्ड लावावे. संबधीतावर कार्यवाही करावी. आजच त्या बाबतीत कार्यवाही व्हावी.

प्र.प्रशासकीय अधि. : स.सदस्य श्री. संजय जोशी यांनी जे मेडीकल सोसायटीच्या संदर्भात मुद्या मांडला त्या बाबतीत नगररचना विभागाने जागेची मार्कीग करून दयावी लगेच अतिक्रमण काढून संबधीतावर पोलीसात गुन्हा दाखल केला जाईल.

उपआयुक्त(म.) : काल्डा कॉर्नरच्या खुल्या जागेचा जो वाद आहे या संदर्भात कायदेशीर बाजू तपासून नगररचना विभगाकडून मार्कीग करून जर अतिक्रमण झालेले असेल तर तात्काळ काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री.अ.रशीद खान : स.सदस्य सांगतात महापालिकेची जागा आहे प्रशासन वारंवार तपासणी करू असे उत्तर देते हे बरोबर नाही. जेंव्हा सदस्य सभागृहात बोलतात त्याच वेळेस कार्यवाही न होता संबधीत व्यक्तीला न्यायालतून स्थगिती आणण्याची संधी दिली जाते हे योग्य नाही. प्रशासनाने लगेच जागेवर जावून तपासणी केली पाहिजे व वेळेच्या आत कार्यवाही होणे अपेक्षीत असते. जागेवर आपण स्वतः जावे व नगर रचनाकार यांनाही सोबत घ्यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : लेआउट मंजूर आहे करारनाम्याची प्रत स.सदस्य देत आहे असे असेल तर आता काय तपासणी करणार आहे नगररचना विभागाने मार्कींग करून दयावे प्रशासकीय विभागास कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.संजय जोशी : काल्डा कॉर्नर च्या जागेच्या बाबतीत संबधीतास जसा न्यायालयात जाण्याची संधी दिली तो प्रकार मेडीकल सोसायटीच्या जागेच्या संदर्भात दिसतो. लेआउटची प्रत असल्यानंतर मोजणी करण्याची गरज नाही आजच्या आज कार्यवाही करण्यास आदेशीत करावे.

मा.सभापती : उपआयुक्त महसूल यांनी दोन्ही साईडवर जावून पाहणी करावी सर्व कायदेशीर बाबी तपासून अतिक्रमण झालेले असेल तर त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी पुढील बैठकीपर्यत या संबधी कार्यवाही करावी..

श्री.संजय जोशी : बैठक संपल्यानंतर मेडीकल सोसायटीच्या जागेवर संबधीत अधिकारी यांना पाठवावे. मार्कींगची गरज नाही. नेहमीच बोललो आहे. मेडीकल सोसायटीतच दोन जागा आहे.एका खुल्या जागेवर भिंत बांधली व रस्त्यावरील रिकामी ठेवली.

प्र.प्रशासकीय अधि. : जी रस्त्यावरील 7 हजार स्क्वेअर फुटची महापालिकेची रस्त्यावरील जागा संबधीताने हस्तांतर केली त्या ठिकाणी नगररचना विभगाने मार्कीग करून दयावी लगेच कार्यवाही केली जाईल.

उप आयुक्त(म.) : नगररचना विभागाचे संबधीत अधिकारी यांना दुपारी जागेवर सोबत घेवून जातो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : भूमाफिया रफिक गुलशनवाला यांची मीडल हॉटेलच्या मागे दोन एकर र जागेवर त्यांनी इमारत निरीक्षक यांना मॅनेज करून अनधिकृत प्लॉटींग केली आहे. त्यातील 29 प्लॉट पोलीस विभगातील, 7 प्लॉट महापालिकेच्या कर्मचा-यांनी घेतलेले आहे. जागेवर काही ठिकाणी घरे झली. पोलीस व मनपाचे लोकांनी या जागेवर कब्जा केला. गरीब लोकांनी रूम बांधली होती. महानगरपालिकेच्या काहील लोकांना हाताशी धरून रूम पाडले. भूमाफिया यांचे बोलण्यावरून कार्यवाही होते. तसेच याच व्यक्तीने सिटीचौक भागात दुकानचे दुरूस्ती करण्याची परवानगी घेतली व पुर्णतःनवीन दुकान तयार केले त्यावेळी मी प्रशासनास पत्र दिले मा. न्यायालयात काही प्रकरण त्यावेळी नव्हते अनधिकृत दुकान बांधल्याबध्दल प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.दुकान दुरूस्ती परवानगी दिली होती का तसेच या जागेच्या प्रकरणी मा. न्यायालयात काही वाद चालू आहे का मा. न्यायालयाच्या नावाखाली पुर्ण दुकानचे काम केले. गरीब व्यक्तीने एक खोली बांधली तर तात्काळ पाडली जाते.या बाबत सविस्तर खुलासा करावा.

श्री.कचरू मोरे : शहरात 45 मीटरच्या आत रस्त्यावर व महापालिकेच्या खुल्या जागेवर जे अतिक्रमण होत आहे. त्या बाबतीत नेहमीच चर्चा होते. मागिल तीन महिण्यापूर्वी

भुमि अभिलेख विभागाचे तसेच सीटी सर्वे विभागाचे निवृत्त झालेले अधिकारी अशा पूर्ण जागेचा सर्वे करण्यासाठी घेतलेले होते. सदर अधिकारी अनुभवी आहे त्यांचे कडून तात्काळ अशा जागेची मोजणी करून घ्यावी. व त्या जागेला संरक्षित भिंती कराव्या जेणे करून महापालिकेची मालमत्ता सुरक्षित राहिल.

मा.सभापती : महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण होणार नाही या बाबत प्रशासनाने दखल घ्यावी. ज्यांनी कुणी अतिक्रमण केले असेल त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

श्री.वसंत नरवडे : महाराष्ट्र राज्यात या महापालिकेने सर्व प्रथम ई-टेंडरींग सुरू केले ज्यांचा ज्यांचा सहभाग मिळाला त्या सर्वांचे तसेच प्रशासनाचे अभिनंदन. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी उपाययोजना केलेली आहे. या जिल्ह्याचे पालकमंत्री, नगर विकास मंत्री या सर्वांचे समाधान झाले. कोट्यावधीचे कर्ज घेवून 55 कोटीचे रस्त्याची आरआरसीची कामे करण्यासाठी ई-टेंडरीग द्वारे निविदा मागविण्यात आल्या. परंतु त्या वेळी दोन तास वेबसाईट कुणी व कशा पध्दतीने बंद केली होती त्या चौकशीचा अहवाल आलेला आहे का, चौकशी कुणी केली कुणी कुणाला अधिकार दिले होते. माहिती घेतली असता त्या वेळी लाईट पुरवठा होता. कर्ते धर्ते त्यांना चौकशीसाठी दिले. ई-टेंडरींग स्वच्छ प्रशासनासाठी घातक ठरत आहे. स्थायी समितीने पुढाकार घेवून रोकले. सायबर गुन्ह्याचाच प्रकार आहे. जर दोन तास बंद होते, ज्यांना टेंडर भरता आले नाही त्यांचेसाठी वेळ का वाढविला नाही. याची सखोल चौकशी करावी स्थायी समितीच्या तीन सदस्य घ्यावे तसेच बाहेरील संगणकमध्ये इंटरनेटवर काम करणारे तज्ञ व्यक्तीना घ्यावे.ईटेडरींग बंद पडली तर दुसरे टेंडर ओपन करायला नको होते. ते रद्य केले नवीन मागविले ही पध्दत चूकीची आहे. डीएसआर रेट वाढले. पाच सहा वर्षापुर्वी दर 2600 होते. आज 3600/3700 चौ.मी. झाले आहे. कोट्यावधीच्या कामात असे केले. खरे गुन्हेगार कोण, वेबसाईट का बंद पडली? सदर दिवशी लाईट गेली होती का सिस्टम बंद होती की की सिस्टम एंगेज ठेवली होती याची चौकशी करावी.जे सत्य होते ते समोर यावे.

श्री.संजय जोशी : ई-टेडरींगला दिल्यानंतर ही वृत्तपत्रात जाहिरात दिली जाते. स.स.रशीद मामूनी उघडकीस आणले. प्रशासनाने चुक कबूल केली. मामूंचे अभिनंदन. फेरनिविदा काढावी. ती कोणत्या पेपरला दिली होती त्याची सुध्दा मा.आयुक्तांनी चौकशी केलेली आहे अशी माहिती आली. सभागृहात त्याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू.) : ई-टेंडरींग सिस्टीम जरी लाईट गेले तरी टेंडर भरण्यासाठी काहीही अडचण येवू शकत नाही. सिस्टीम बंद किंवा एंगेज करता येत नाही. लाईट गेली तरी निविदा भरण्यास त्रास नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : 54कोटीचे काम होते तीन वृत्तपत्रात जाहिरात दिली त्यातील मुफस्सीर व स्वरंगंगा पेपर बंद आहे. तिसरे वृत्तपत्र सिटीजन्स पुर्णत संबधीत ठेकेदाराचे विकत घेतले 54 कोटीचे काम करणार पुरेपुर प्रसिध्दी का केलेली नाही. मागिल बैठकीत या संबधीत चर्चा केली त्यावर मा.आयुक्त यांनी हे मान्य केले होते जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्यात येईल असे म्हटले. 54 कोटीच्या निविदा महाराष्ट्र स्तरावरील वृत्तपत्रांऐवजी स्थनिक वृत्तपत्रात दिले, खुलासा करावा. स्थायी समितीने चर्चा केल्यानंतर दुस-याच दिवशी सामना, लोकमत, सकाळ पेपरमध्ये जाहिरात आली त्यापुर्वी वाईड पब्लीसिटी का केली नव्हती.यात जे दोषी असेल कार्यवाही होणे गरजेचे आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : सभागृहात नुसती चर्चा होते त्या बाबतीत प्रशासन कार्यवाही करीत नाही सहा महिण्यापासून अतिक्रमणाच्या संदर्भात बोलत आहे पोलीस फोर्स नाही असे उत्तर दिले जाते. फुलेनगर भगात पीरबाजार ते दर्गा पर्यत महापालिकेच्या जागेवर तसेच एकनाथनगर डी.पी. रोडवर मोठे अतिक्रमण झाल्याचे वारंवार कळविले तरी काढले जात नाही. पोलीस फोर्स केंव्हा मिळणार व अतिक्रमण केंव्हा हटविणार आहे

उपआयुक्त(म), : या बाबत त्वरीत पाहणी करून कार्यवाही केली जाईल. सदर टपरी हटविण्यात येईल.

श्री.हिंमतराव दाभाडे : दर्गाह रोडवर अतिक्रमण व दुध डेअरीच्या नावाखाली अतिक्रमण आहे किंवा नाही.

मा.सभापती : उपआयुक्त महसूल यांनी दोन्ही ठिकाणी जावून पाहणी करावी व अतिक्रमण झ ालेले असेल तर त्वरीत काढण्याची कार्यवाही करावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे : एखाद्या कर्मचाऱ्यास अॅन्टी करप्शन प्रकरणात पकडले तर त्यांना डयुटी करता येते का?

विधी सल्लागार : सदर विभागाचा रिपोर्ट, कर्मचारी प्रथमदर्शनी दोषी असेल तर तसा रिपोर्ट उपआयुक्त यांचेकडे येतो त्यांनंतर योग्य ती कार्यवाही होते.

श्री.हिम्मतराव दाभाडे : वार्ड क कार्यालयातील कोरडे नावाचे कर्मचारी यांना 19-9-2007 रोजी अॅन्टी करप्शन विभागाने लाच घेण्याच्या आरोपाखली पकडले कालपर्यत त्या कर्मचा'याची सेवा केली कार्यवाही होण्यास उशीर का व कुणामुळे झालेला होता.

उप आयुक्त(महसूल) : श्री.कोरडे यांना निलंबीत केलेले आहे. अॅन्टी करप्शन विभगाकडून जेंव्हा रिपोर्ट विभाग प्रमुखाकडे येतो. तेंव्हा सर्व कायदेशीर बाबी तपासून तो खरोखरच असेल तर निलंबीत करणे अपेक्षीत असते. निलंबीत करणे आवश्यक नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : संबधीत कर्मचारी यांचे वर 30-9-2007 रोजी एफआयआर दाखल झाला. त्यांनी 200 रू. लाच घेतलेली होती त्यांचेवर गुन्हा दाखल झालेला होता. त्यांना डयुटीवर ठेवण्याचा अधिकार होता का उशीरा कार्यवाही होण्याचे कारण काय?

उपआयुक्त((म.) : सदर कर्मचा-यांचे निलंबणाचे आदेश काढलेले होते ते देण्यास उशीर का झालेला आहे याची चौकशी करू.

मा.सभापती : जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. संजय जोशी : स्पेक कंपनीचा करार रद्द करणार हे खरे आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मेडोज हॉटेलच्या मागे दोन एकर जागेत पोलीस विभगाचे तसेच महापालिकेचे सहा कर्मचा-यांची सोसायटी आहे. त्याच जागेत एक खेली बांधलेली होती. खालच्या अधिका-यांची अतिक्रमीत असलेली खोली पैसे वगैरे घेवून तोडली ते तोडण्याचे कारण काय, श्री.रफिक गुलशन यानी सिटीचौक भागात दुकानाची दुरूस्ती करण्यासाठी परवानगी घेतली होती का, या बाबत मा.न्यायालयात काही प्रकरण चालू आहे का, परवानगी नसतांना नवीन दुकान कसे केले.परवानगी नसेल तर दुकान पाडले जाईल का याचाही खुलासा करावा.

प्र.प्रशासकीय अधि. : मेडोज हॉटेलच्या मागे दोन एकर जागेत जे अतिक्रमण झाले त्याची माहिती घेउन पुढील बैठकीत खुलासा दिला जाईल. रूम तोडल्याचे माहित नाही.

उपअभियंता(न.र.) : या संबधी सध्या माहिती नाही.

मा.सभापती : या संबधी 24 तासात माहिती घेवून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : त्यांना बांधकाम परवानगी नाही. सिटीचौक येथे रात्री उशीरापर्यंत काम चालू होते, ते पाडणार का? लिखीत तक्रार दिली. त्यांना नोटीस काढली का, 7 दिवस वेळ देवून न्यायालयात दाखल झाले. मनपाचे वकील हजर झाले नाही.

उपआयुक्त(म) : सदर बाधंकामास कायदेशीर परवानगी दिली आहे किंवा नाही याची चौकशी केली जाईल. परवानगी घेतली नसेल तर कायदेशीर नोटीस देवून कार्यवाही केली जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सदर व्यक्तीने बांधकाम परवानगी घेतली नाही. 2 महिन्यांपासून काम चालू आहे.

श्री.संजय जोशी : स्पेक एजन्सीचा करारनामा रद्द करणार आहे काय?

उपआयुक्त(सिडको) : स्पेक संदर्भात दि 18 आक्टोबर 07 रोजी मा.आयुक्त यांनी सर्व वार्ड अधिकारी यांची सयुंक्त बैठक घेतली सदर एजन्सीचे काम समाधानकारक नाही व मुदतीत काम पुर्ण केले नसल्याने त्यांचे टेंडर रद्य का करण्यात येवू नये म्हणून नोटीस देण्या बाबत निर्देश दिलेले आहे. नोटीस तयार करून विधी सल्लागार यांचेकडे दिलेली असून त्याची तपासणी करून नोटीस देण्याची कार्यवाही होईल 15 दिवसाची मुदत देवून त्यांनी आजपर्यतचे केलेले काम महापालिकेकडे सादर करायचे आहे. `त्या एजन्सीने केलेले काम व त्या कामाचा दयावयाचा मोबदला तसेच महापालिकेचे कराच्या माध्यमातून झालेले नुकसान या सर्व बाबीचा यात समावेश करून नोटीस देण्यात येणार आहे.

श्री.संजय जोशी : दोन महिण्यापूर्वी स्पेक एजन्सीला कुठलेही पेमेन्ट करू नये असे आदेशीत केले होते तरी दिले. एजन्सीला नोटीस देणार आहोत आज सुध्दा सदर एजन्सी त्यांचे वेबसाईटवर मालमत्तांची लिंक करीत आहेत.

उपआयुक्त(सिडको) :.तीन प्रभkगात या एजन्सीचे सध्या काम चालू आहे 15 नोव्हेंबर 2007 पर्यत जेवढे काम ही एजन्सी करेल त्याचे सर्व रेकॉर्ड महापालिका ताब्यात घेणार आहे.

श्री.संजय जोशी : वेब साईटवर लिंक करणार ते महापालिका रेकॉर्ड ताब्यात घेणार त्यानंतर पेमेंन्ट थांबविण्याचा तसेच करारनामा रद्य करण्याचा अधिकार महापालिकेला राहिल का?

उपआयुक्त (सिडको) : जेंव्हा मागणी बिले दिली जातील.वसूली सुरू होईल तेंव्हा 100 टक्के सदर एजन्सीने काम पूर्ण केले असे म्हणता येईल. 85% काम कॉम्प्युटरमध्ये फिड झ ालेले आहे.

श्री.संजय जोशी : माहिती बरोबर दिली जात नाही. एका इमारतीच्या तिस-या मजल्यावर एक रूम बांधली म्हणून स्पेकने नोटीस दिली वार्ड अधिकारी व स्पेकचे लोक त्या ठिकाणी प्रत्यक्ष मी बोलविले तर कुठेही बांधकाम केलेले नव्हते. स्पेकचे बील वाढावे म्हणून चुकीच्या नोटीसेसवर रक्कम टाकून दिली. त्यामूळे सामान्य नागरीकाची कुचंबना होत आहे. मालमत्तेचा सर्वेची नोंद व त्या मालमत्तेस लागलेला टॅक्स हा बरोबर आहे यासाठी सर्व वार्ड अधिकारी यांची एनओसी घ्यावी. स्पेक एजन्सीचे 80 टक्के बोगस बिले आहे. अगोदरच त्या मालमत्तेस बरोबर टॅक्स आकारलेला आहे. ज्याचा 5 हजार टॅक्स होता त्यांना 10 ते 12 हजारची नोटीस दिली तो झोन कार्यालयात जावून रद्द करावा लागतो. यामुळे नागरीकांचा रोष या सभागृहावर राहिल. या सभागृहाया मान्यतेने स्पेकला पेमेंट दिले गेले. नागरीकांच्या या तक्रारी असतील त्या सोडविण्यास अडचणी येतील. त्यासाठी प्रत्येक मालमत्तेचा टॅक्स बरोबर लागलेला आहे म्हणून वॉर्ड अधिकारी यांची एनओसी घ्यावी, त्यानंतरच पेमेंट व टेंडर वगैरे रद्द करण्याची कार्यवाही करावी. या एजन्सीचा गलथान कारभार असतांना सिडको भागातील सर्व्हेचे काम याच एजन्सीला दिले गेले. पुन्हा प्रशासन ती एजन्सी चांगले काम करीत नाही म्हणून ठेका रद्द करण्याबाबत नोटीस देण्याची वेळ येते, यावरून

प्रशासनाचा कारभार स्वच्छ नाही हे दिसून येते. स्पेकला दिलेले कामाची फिजीकली माहिती घ्यावी, त्यानपंतर ठेका रद्द करावा व पेमेंटही देवू नये. 50/- रूपये हजेरी देवून ज्यांना ज्ञान नाही अशा मुलांकडून या एजन्सीने काम करून घेतलेले आहे. याची संपूर्ण चौकशी व्हावी. योग्य ती कार्यवाही व्हावी.

श्री. वसंत नरवडे पा. : महापालिकेने असेसमेंट केलेल्या इमारतींना स्पेक एजन्सीने पुन्हा नव्याने टॅक्स आकारणी जास्तीची करून त्याची बिले वाढविली आहेत. जेथे टॅक्स आकारलेला आहे, पुन्हा आकारला गेला असेल तर स्पेकला 10 हजार दंड आकारणी करावी. अशा इमारतींचा शोध घ्यावा व जे स्पेकला जास्तीचे पैसे गेले ते वसूल करावेत. आतापर्यंत स्पेकला मोठ्या प्रमाणात बिलापोटी रक्कम दिली आहे. संगणकाच्या नोंदीनुसार ग्राह्य न धरता जे रजिस्टर्ड घर नंबर टॅक्स असेसमेंट केलेल्या संचिका असतील त्यानुसार तपासणी करावी. जर त्यांनी जास्त रक्कम आकारली असेल तर त्या एजन्सीला दहापट दंड आकारणी करावी. जेथे जुनी घरे होती त्या ठिकाणी पाच मजली इमारत झालेली आहे. खालच्या मजल्यापर्यंतच टॅक्स आकारलेला आहे. अशी परिस्थिती आहे. स्पेकने केलेल्या सर्व्हेनुसार करामध्ये किती वाढ झाली, माझ्या माहितीप्रमाणे यावर्षी 50% सुध्दा मालमत्ता कर वसुल झालेला नाही. स्पेकचा करारनामा रद्द करू नये. त्यांचेकडून ठरवून दिलेले काम पूर्ण करून घ्यावे. झालेली नुकसान भरपाई घ्यावी. स्पेकने जुन्या मालमत्तांचेही सर्वेक्षण केलेले आहे ते महापालिकेने स्विकारू नये.

श्री. सजंय जोशी : स्पेकला नोटीस देवून ठेका रद्द केल्यास महापालिकेचे नुकसान होणार आहे. दिलेले काम या एजन्सीकडून करून घ्यावे. या एजन्सीला पेमेंट करू नये.

श्री.कचरू मोरे : स्पेकच्या संदर्भात ज्या सुचना स.सदस्यांनी केल्या त्या बरोबर आहेत. या एजन्सीने 50/- रूपये हजेरी देवून ज्याला कोणतेही ज्ञान नाही अशा मुलांकडून सर्व्हेचे काम करून घेतले. या मुलांनी अस्तित्वात असलेले घर अ, ब, क, ड वर्गवारी नुसार कोणत्या गटात येते याची शहानिशा न करता लोकांकडून पैसे घेवून कमी-जास्त कर आकारणीचे काम या एजन्सीकडून झालेले आहे. काही ठिकाणी महानगरपालिकेच्या नांवाने कराची नोटीस न देता ज्यांचेकडे दुकान वगैरे असेल त्या मालकाच्या नांवाने कर आकारणी केली आहे. एजन्सीच्या ही बाब निदर्शनास आणून दिली त्यानंतर काप्रकरणात त्यांनी दुरूस्ती केली आहे. ज्या मालमत्तेला अगोदरच कर लागलेला आहे तेथे स्पेकने सर्व्हे करून कर आकारणी केली. त्यामुळे पुर्वीचा कर, की स्पेकने आकारलेला कर भरायचा यात नागरीकांची कुचंबणा होत आहे. आकारलेला कर हा फिजीकल पध्दतीने आहे की नाही याची चौकशी केली पाहिजे. ज्या चुका झाल्या त्या दुरूस्त कराव्यात. कररानामा रद्द न करता काम करून घ्यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : स्पेक एजन्सीला किती दिवसाची मुदत दिली होती मुदत संपल्यानंतर जी दंडात्मक कार्यवाही करणार होते ती करून दंडाची रक्कम वसूल केलेली आहे का आतापर्यंत स्पेकला किती रक्कम देण्यात आली आहे.

उपआयुक्त(सिडको) : कामाची मुदत सहा महिण्याची होती मुदतीत काम केले नाही तर प्रत्येक दिवसाला 5 हजार दंडाची आकारणी होत आहे. सहा महिण्यानंतर एजन्सीला वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे तो कालावधी वगळून पूढील कालावधीसाठी दंड आकारणीची कार्यवाही करता येईल.

श्री.अ.साजेद.अ सत्तार : मुदतवाढ दिली म्हणून दंड माफ करता येतो असे नाही.

श्री.संजय जोशी : मुदत संपल्यानंतर 15 दिवस दंड आकारणी केली 16 व्या दिवशी सभागृहात मुदतवाढीसाठी ठेवले असे करीत तीन वर्षाचा कालावधी गेला.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कालावधी संपल्यानंतर सभेची मान्यता घेईपर्यत मधल्या काळातील जितके दिवस विलंब झाला त्याची दंड म्हणून रक्क्म वसूल केली का?

उपआयुक्त (सिडको) : मुदतवाढ देण्या व्यतिरिक्त जो जो विलंब झाला त्याचा दंड आकारून बिलातून वसुलीची कार्यवाही केली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : करारनामा केला तेंव्हा एजन्सीकडूने सहा महिण्याची बँक गॅरंटी दिलेली असेल त्यानंतर पुन्हा बँक गॅरन्टी घेतलेली आहे का ?

उपआयुक्त(सिडको) : दि 26-10-2007 रोजी बँक गॅरन्टी घेतलेली आहे पुर्वीची बँक गॅरन्टी ही सहा महिण्यासाठीच होती.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सहा महिण्याची मुदत संपल्यानंतर पुन्हा बँक गॅरन्टी घेण्याची प्रशासनाला गरज का भासली नाही यास कोण जबाबदार आहे.

श्री.मो.जावेद मो.इसाक : आज रोजी बँक गॅरन्टी नुसार तेवढी रक्कम आहेत का?

उपआयुक्त (सिडको) : ज्या ज्या सुचना सदस्यांनी केलेल्या आहे त्यानुसार सर्व तपासणी करून कार्यवाही केली जाईल.,एजन्सीचे 26 ऑक्टोबर रोजी बँक गॅरन्टीचे नुतनीकरण करून दिले आहे. एकूण रक्कमेच्या 5 टक्क् रक्कम बँक गॅरन्टी असावयास पाहिजे.

मा.सभापती : स्पेक एजन्सीचे काम समाधानकारक नसल्याची खंत स.सदस्यांनी व्यक्ती केलेली आहे या संदर्भात या एजन्सीला कुठलेही पेमेन्ट देवू नये निर्णय घेतलेला होता.स्पेक एजन्सीच्या सर्वे संदर्भात नागरीकांना आव्हान करून तक्रारी मागवाव्या त्या पूर्ण सोडवून प्रत्येक करदाता नागरीक टॅक्स लावल्या बाबत समाधानी असेल तरच या एजन्सीला पेमेंन्ट देण्याचा विचार व्हावा. सदर एजन्सीच्या बॅकेतील ज्या ठेवी आहे त्या परत करू नये.

श्री.वसंत नरवडे : जन्म-मृत्यू प्रमाणपत्रासाठी नळपट्टी तसेच मालमत्ता कर भरणा केल्याशिवाय दिले जाते नाही हे चूकीचे असून कर वसूली करण्यासाठी ही मोहिम ठेवली असेल तर चूकीचे आहे. श्री.मिश्रा नावाचे व्यक्ती यांना अशा प्रकारची वागणूक दिली आहे. अनेक वेळा अधिकारी याचा गैरवापर करीत आहे. प्रभाग-ड येथे श्री.निकम यांनी एका पत्रकाराला परत पाठविले.

उपआयुक्त(सिडको) : जन्म-मृत्यू किंवा कोणत्याही प्रकारचे दाखला, एनओसी देण्याकरीता कराचा भरणा करावा असे आदेश काढलेले होते परंतू 30-9-2005 रोजी मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे यांचे अध्यक्षतेखली गेस्ट हाउसला बैठक होवून यावर चर्चा झ ाली पुन्हा 5-10-2007 रोजी आदेश काढले की अशा प्रकारचे दाखले एनओसी देतांना कुठल्याही प्रकारचे कर भरण्याची सक्ती करू नये.

श्री.संजय जोशी : कोणत्या कायदयानुसार तसे परीपत्रक काढले होते.

उपआयुक्त(सिडको) : वसूली होण्यासाठी तसे आदेश काढले होते.

श्री.संजय जोशी : कोणत्या कायदयानूसार असे परीपत्रक काढून वसूली करता येते.आपले कर्मचारी वसूली करण्यासाठी सक्षम नाही मृत्यूचा दाखला देण्यासाठी त्या व्यक्तीकडून अगोदर कराची वसूली करण्याची सक्ती करणे योग्य नाही एखादा नागरीक महापालिकेने बेकायदेशीर नोटीस काढून अशी नागरीकांची पिळवणूक करीत आहे म्हणून न्यायालयात हे प्रकरण घेवून गेले तर महापालिकेची बदनामी होईलच अधिका-यावर सुध्दा कार्यवाही होवू शकते.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : ज्या वार्ड अधिकारी यांनी अडवणूक केली असेल त्या बाबत उपआयुक्त (सिडको) यांनी चौकशी करावी व त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| श्री.अ.रशीद खान | : सेन्ट्रल गव्हर्नमेंटने कायदा काढला जन्म मृत्यू झाल्यावर नोंद करावयास पाहिजे. परंतू अशा वेळी टॅक्स वसूल करण्याची सक्ती नाही 5 ऑक्टोबर 2007 रोजी कर वसूल करण्याची यामागे अट नसावी श्री. निकम यांनी नुकतीच एका नागरीकाची अडवणूक केली होती त्यांना नोटीस द्यावी. प्रशासनातील अधिका-यांचा समन्वय नाही. |
| श्री.वसंत नरवडे पा. | : श्री.निकम, वॉर्ड अधिकारी यांची चौकशी करून कार्यवाही करावी. |
| उपआयुक्त(सिडको) | : 5 ऑक्टोबरच्या नंतर जर कुणाची अडवणूक केली असेल तर याची चौकशी करून संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही केली जाईल. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | : बीपीएमसी ॲक्ट 451 सेन्क्शन म्हणजे काय माहिती द्यावी. |
| विधी सल्लागार | : विवक्षीत प्रकरणामध्ये महापालिका किंवा इतर प्राधिकरणाचा कुठलाही ठराव किंवा आदेश निलंबीत किंवा विखंडीत करण्याचा राज्य शासनाचा अधिकार हे यात नमूद केले आहे. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | : बीपीएमसी ॲक्ट 451 नुसार माधव तुळशीराम घोरपडे यांनी मुथीयान कॉर्नर येथे महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण केले आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. अनेक बोगस कागदपत्र निदर्शनास आले आहे सदर व्यक्तीने 1984 मध्ये जागेचा मोबदला घेतलेला असतांना जागेच्या बदल्यास महापालिकेला जागेची मागणी केल्यानंतर जागा दिली जाते जागा देतांना मागिल रेकॉर्ड तपासणी करायला पाहिजे होते त्या जागेवर बांधकामास परवानगी दिली ती रद्य केली का ? |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी नाही पूढील बैठकीत या बाबत प्रशासनाने सविस्तर खुलासा दयावा. |
| श्री.अ.रशीद खॉन | : दिपावली तसेच रमझान ईद असल्यामूळे या शहरात मोठया प्रमाणात माल आलेला आहे त्यातील काही गाडया पकडल्या गेल्या नाही जो दंड महापालिकेला येतो तो किती आलेला आहे.तडजोड किती प्रकरणात झालेली आहे. |
| जकात अधिक्षक | : दिपावली तसेच रमझान ईद निमित्त शहरात फटाके तसेच कपडा मोठया प्रमाणात आलेलाअसून त्यापोटी 5.95कोटी जकात वसूल झालेली आहे. दंडापोटी 3.91 लक्ष वसूल झालेले असून रहदारी दंड 23 हजार वसूल करण्यात आले आहे. |
| श्री.अ.रशिद खॉन | : माझे माहितीनुसार जकात अधिक्षक तसेच ठेकेदार मिळून कमीत कमी महानगरपालिकेचे 30 ते 35 लक्षचे नुकसान केलेले आहे. यापूर्वी 15 ते 20 लक्ष दंडापोटी वसूल झाली होती या वर्षी 3 लक्ष वसूल झाले उर्वरीत कुठे गेले. |
| जकात अधिक्षक | : खाजगी ठेकेदाराची जकात वसुलीची यंत्रणा भक्कम तसेच मोठी आहे. त्यामूळे चोरीचे प्रमाणे कमी झालेले आहे. |
| श्री.अ.रशीद खान | : जी दंडापोटी महापालिकेला रक्कम यायला पाहिजे ती येत नाही असा माझा आरोप आहे. 3 महिण्यात 3 लक्षची दंडापोटी रक्क्म दाखवीत आहे याची चौकशी व्हावी. |
| श्री.नरवडे वसंत | : चांगल्या व हलक्या क्वॉलीटीच्या वस्तूवरही वाद घातला जातो त्यातून ज्याचा माल असतो त्यांला तडजोड करावी लागते. 3 ते 5 टक्के रक्क्म ठेकेदार ठेवतो महापालिकेला 2 ते 5 हजाराची पावती देवून गाडी सोडली जाते. सर्वसामान्य नागरीक एखादी वस्तु घेवून आल्यानंतर नवीन प्रमाणे जकात आकारून अमुक ठिकाणी गाडी पकडली असे सांगीतले जाते. हे चुकीचा मार्ग आहे. यात सर्वसामान्य नागरीक व व्यापारी यांना वेठीस धरले जाते हे योग्य नाही. ठेकेदाराच्या |

सांगण्यावरून महापालिकेत येणारी रक्कमेचा तडजोडीने निर्णय घेतला जातो त्या वेळेस महापालिकेचे अधिकारी बघ्याची भुमिका घेतात. याचा अर्थ महापालिकेचे अधिकारी ठेकेदाराचे नोकर झाले. महापालिकेने ॲसीसमेन्ट करून तडजोड करावयास पाहिजे, तसे होत नाही. मागिल वेळेस अशाच पकडलेल्या गाडया यापासून महापालिकेला दंडापोटी 30 ते 35 लक्ष मिळाले म्हणून बजेटमध्ये नोंद आहे या वर्षात 3 लक्ष मिळातात हे बरोबर नाही.

उपआयुक्त (म.) : दंडाच्या केसेस जास्तीत जास्त होतील याची दक्षता घेतली जाईल.गेल्या वर्षी मार्च अखेर 12 लक्ष दंडापोटी वसूल झाले या मार्च अखेर 12 लक्षपेक्षा जास्त वसूली करण्याचे प्रयत्न केले जाईल.

मा.सभापती : जकात दंडापोटी कमी वसूली का झाली याची चौकशी करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : रफिक गुलशनवाला यांनी बांधकाम परवानगी घेतली होती काय नसेल तर त्यांनी दोन मजली इमारत उभी केली आहे काय कार्यवाही करणार आहे.

उपअभियंता (न.र.) : श्रीमती गुलशनवाला सिटीचौक यांना बांधकाम दुरूस्ती किंवा इमारत बांधकाम परवानगी देण्यात आलेली नाही.

उपआयुक्त (म.) : बांधकाम परवानगी घेतलेली नाही कायदेशीर नोटीस देवून कार्यवाही केली जाईल. नियमानुसार 15 दिवसाची नोटीस देणे आवश्यक आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यापूर्वी संबधीतास नोटीस दिलेली आहे माझे कडे त्याची प्रत आहे आता पून्हा नोटीस देण्याची गरज काय ?

प्र.प्रशासकीय अधि. : यापूर्वी गुलशन स्टोअर्सच्या मालकाला म्हणजे त्यांचे आईच्या नावाने दोन महिण्यापूर्वी नोटीस दिलेली आहे.

उपआयुक्त(महसूल) : यापूर्वी नोटीस दिलेली असेल तर पून्हा देण्याची गरज नाही पुढील कार्यवाही तात्काळ होईल.

श्री.अ.रशिद खान : 54 कोटीची रस्त्याची कामाची जाहिरात तीन पेपरमध्ये दिली होती त्यातील सिटीजन्स चालू आहे इतर दोन पेपर कोणते आहे त्याची माहिती दयावी.

प्र.जनसंपर्क अधि. : महापालिका ई-टेंडरीग विभगामार्फत दिं.4-10-2007 रोजी रस्त्याच्या कामाबाबत एक निविदा सुचना प्राप्त झाली होती. रोटेशन नुसार सदर निविदा दै.स्वरंगगा, दै.सिटीजन्स, तसेच दै.मुफस्सीर (उर्दू ) या तीन दैनिकांना प्रसिध्दीसाठी पाठविण्यात आली.

मा.सभापती : 25 लक्षच्या वरील काम असेल तर पब्लीसिटी होणे आवश्यक असते अशी माझी माहिती आहे. हे सत्य आहे.

प्र.जनसंपर्क अधि. : संबधीत विभागाची तशी मागणी असल्यास कार्यवाही केली जाते.

श्री.संजय जोशी : यापूर्वी 50 लक्ष त्यापेक्षा जास्त रक्कमेचे टेंडर कोणत्या वृत्तपत्रात दिलेले होते.

प्र.जनसंपर्क अधि. : रोटेशन प्रमाणे दिलेले आहे.

श्री.संजय जोशी : 1 कोटीचे संगणकाचे टेंडर 3 हजार पर कॉलम सेंटीमीटर मध्ये दिले जाते 54 कोटीचे टेंडर बंद असलेल्या पेपरला दिले जाते हे योग्य नाही.

प्र.जनसंपर्क अधिकारी : संबधीत विभागाने तशी मागणी केली होती त्यानूसार त्या पेपरला दिले आहे.

श्री.संजय जोशी : ज्या पेपरच सर्क्यलेशन एवढे आहे असे शासनाकडे नोंद आहे किंवा शासन मान्य आहे अशाच वृत्तपत्रात दिले पाहिजेत. ज्या पेपरचा खप कमी आहे त्यास जाहिरात देणे योग्य आहे का ?

श्री.अ.रशिद खान मामू : रोटेशन बदलावे या प्रकरणात कोण दोषी आहे याची चौकशी व्हावी.

श्री.वसंत नरवडे : कोणते पेपर चालू आहे कोणते साप्ताहिक चालू आहे कोणत्या वृत्तपत्राला कोणते रक्कमेपर्यंत रोटेशन नुसार जाहिरात दयायला पाहिजे. जे साप्ताहिक बंद आहे त्यांना कसे दिले.54 कोटीचे टेंडर देते वेळेस रोटेशन पाहिजे यात व ई-टेंडरीगमध्ये जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खान मामू : चौकशी करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.संजय जोशी : मोठया पेपरला दयायला पाहिजे मा.आयुक्तांनी मान्य केले जे दोषी असेल त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.

मा.सभापती : ई-टेडरींग ब्लॉक का झाली होती तसेच रोटेशन नुसार पेपरला टेंडर का दिलेले नाही तसेच रोटेशन पध्दत ही 1997 ची आहे. ती जुनी असून जे वृत्तपत्र बंद आहे नुसतेच त्यांचेकडे लायसन्स असून जाहीरात घेत असेल तर बरोबर नाही. याची तपासणी करून योग्य ती कार्यवाही करावी व पुढील बैठकीत याबाबतचा अहवाल सादर करावा.

मा.सभापती : लाईटचा एक विषय आहे माहिती घ्यायची आहे. संबधीत अधिकारी खुलासा करतील.

कार्य.अभियंता(विद्यु) : स.सदस्य श्री. नरवडे पाटील यांनी मुद्दा विचारलेला होता की लाईट सेव्हीग होते का? लाईट सेव्हींग होते त्याची माहिती काढलेली आहे. त्यात कन्झ्युमर नंबर, पुर्वी किती बील येत होते, आता किती येते यासंबंधीची पूर्ण माहिती त्यात आहे. सर्व स.सदस्यांना प्रत दिली जाईल. 60 ते 65 टक्के सेव्हींग होते. यात महापालिकेचा फायदाच आहे. सिडको भागात 2500 ते 3000 हजार दिवे लागतील. उर्वरीत जुन्या शहरातच मुख्य रस्त्यावर लावले जातील.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद